प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक ०९.१०.२०२६

सांगवी, ता. शिरपुर, जि. धुळे वन परिक्षेत्र कार्यालयातील वनरक्षक राहुल बहिरम यांनी तक्रारदार यांच्याकडे १५००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा

अ.क्र.	शिर्षक	तपशिल
१	घटक	धुळे
२	तक्रारदार	पुरुष, वय ३१ वर्षे,
३	आरोपी	राहुल रामदास बहिरम, वय ३० वर्षे, वनरक्षक, वन परिक्षेत्र, सांगवी, ह.मु. वन विभागाचे शासकिय निवासस्थान, सांगवी. मुळ रा. मु. धवळीविहीर, पो. जेबापुर, ता. साक्री, जि. धुळे
४	तक्रार	तक्रारदार यांचे वडीलांना उदरनिर्वाहासाठी वनविभागाकडुन राखीव शेतजमीन मिळाली आहे. शासनाकडुन शिरपुर तालुका दुष्काळग्रस्त म्हणुन घोषित झाला असुन दुष्काळनिधी मिळणेकरीता जे फॉर्मची (वनहक्काचे दस्तऐवज) आवश्यकता असल्याने तक्रारदार यांनी त्यांचे वडील व त्यांचे वकवाड गावातील इतर १४ शेतकऱ्यांचे अर्ज सांगवी वन परिक्षेत्र कार्यालयात वनरक्षक राहुल बहिरम यांचेकडे जमा केले होते. तक्रारदार यांनी दि.०८.१०.२०२६ रोजी वनरकक्षक राहुल बहिरम यांची कार्यालयात भेट घेवुन त्यांनी जमा केलेल्या अर्जाबावत विचारपुस केली असता वनरक्षक राहुल बहिरम यांनी तक्रारदार यांच्याकडे जे फॉर्म देण्याकरीता प्रती फॉर्म १०० रुपयाप्रमाणे १५०० रुपयाप्रमाणे लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती.
५	तक्रारीची पडताळणी	सदर तक्रारीची दि.०८.१०.२०२६ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे वनरक्षक राहुल बहिरम यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे एका जे फॉर्मचे (वनहक्काचे दस्तऐवज) १०० रुपयांप्रमाणे १५ फॉर्मचे १५००/–रू लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते.
६	सापळा कार्यवाही	दि.०८.१०.२०२६ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता सापळा कारवाई दरम्यान वनरक्षक राहुल बहिरम यांना पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन १५००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे.
७	गु.र.नं.,कलम/ पो.स्टे./ जिल्हा, दिनांक व वेळ	शिरपुर तालुका पो.स्टे., जि. धुळे येथे गु.र.नं.२८७/२०२६ भ्र.प्र.का. कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
८	आरोपी अटक दिनांक व वेळ	आरोपीस अटक करण्यात आली आहे.
९	सापळा अधिकारी	पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे
१०	पर्यवेक्षक व तपास अधिकारी	सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे
११	सापळा पथक	स.फौ. राजन कदम, पोहेकॉ. मुकेश अहिरे, मकरंद पाटील, रामदास बारेला
१२	मार्गदर्शन	श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, मो. नं.८८८८८३२१४६ श्री. प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक मो.नं.९६७३९८८००० श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक, मो.नं.८१४९८३४४६५ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

संपर्क पत्ता	घटक कार्यालय	परिक्षेत्रिय कार्यालय	ला.प्र.वि. मुख्यालय
पत्ता	ला.प्र.विभाग, धुळे संतोषी माता मंदिराजवळ, शिवतिर्थ, धुळे	ला.प्र.विभाग, नाशिक परिक्षेत्र, तिबेटियन मार्केट, मनपा, भाजीपाला मार्केटचे वर, शरणपुर रोड, नाशिक	ला.प्र.विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई
दुरध्वनी क्र., व्हॉटसअॅप क्र.	०२५६२–२३४०२०, १०६४ ७७९८१६१०६४	०२५३–२५७५६२८	०२२–२४९२१२१२
इमेल आयडी	dyspacbdhule@gmail.com	spacbnasik@gmail.com	acbwebmail.mahapolice.gov.in

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.

Scanned with OKEN Scanner